**प्रेसनोट दि. ०३.०९.२०२१**

लोकसेवक श्रीशैल ऊर्फ श्रीकांत विश्वनाथ घुळी, मुळ पद पुरवठा अव्वल कारकून तहसिल कार्यालय मिरज, अति.कार्यभार मंडल अधिकारी कुपवाड, सांगली, बुधगांव व समीर बाबासाहेब जमादार, संगणक ऑपरेटर यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांची आई वारसदार असलेल्या जमीनीच्या संदर्भात मंडल अधिकारी घुळी यांचे समोर सुरू असलेल्या तक्रारीच्या सुनावणीचा निकाल तक्रारदार यांचे बाजूने देण्यासाठी मंडलअधिकारी घुळी व त्यांचे कार्यालयात काम करणारे संगणक ऑपरेटर समीर जमादार यांनी ७०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२८.०८.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २९.०८.२०२१ रोजी, दि.३०.०८.२०२१ रोजी, दि.०१.०९.२०२१ रोजी व दि.०२.०९.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार जमीनीसदंर्भातील तक्रारीच्या सुनावणीचा निकाल तक्रारदार यांचे बाजूने देण्यासाठी मंडल अधिकारी धुळी यांचे सांगणेवरून त्यांचे कार्यालयात काम करीत असलेले समीर जमादार यांनी तक्रारदार यांचेकडे ७०,०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी २५,०००/- रूपये देण्यास सांगून उर्वरीत ४५०००/- रूपये निकाल लागल्यानंतर देण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर राजवाडा परिसर मंडल अधिकारी कार्यालय सांगली या ठिकाणी सापळा लावला असता समीर बाबासाहेब जमादार,वय ३६ वर्ष संगणक ऑपरेटर रा. ग्रामपंचायत जवळ मल्लेवाडी ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून २५,०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले असून लोकसेवक श्रीशैल ऊर्फ श्रीकांत विश्वनाथ घुळी, वय ५६ वर्ष मुळ पद पुरवठा अव्वल कारकून तहसिल कार्यालय मिरज, अति.कार्यभार मंडल अधिकारी कुपवाड, सांगली, बुधगांव रा. शिवाजी नगर, दंडोबा रस्ता, मालगांव ता. मिरज जि. सांगली यांना ताब्यात घेतले आहे.

लोकसेवक श्रीशैल ऊर्फ श्रीकांत विश्वनाथ घुळी, वय ५६ वर्ष मुळ पद पुरवठा अव्वल कारकून तहसिल कार्यालय मिरज, अति.कार्यभार मंडल अधिकारी कुपवाड, सांगली, बुधगांव रा. शिवाजी नगर, दंडोबा रस्ता, मालगांव ता. मिरज जि. सांगली व समीर बाबासाहेब जमादार,वय ३६ वर्ष संगणक ऑपरेटर, खाजगी उमेदवार रा. ग्रामपंचायत जवळ मल्लेवाडी ता. मिरज जि. सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, संजय संकपाळ, अजित पाटील, प्रितम चौगुले, भास्कर भोरे, राधिका माने, विना जाधव, श्रीपती देशपांडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट — www.acbmaharashtra.gov.in

(Sujay Ghatge)
Dy. Supdt. of Police
... ...uption Bureau, S...

Scanned with CamScanner